# ‘आठवणींच्या हिंदोळ्यावर’मधून उलगडले भावविश्व

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. ६ : येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात प्रथमच सादर झालेल्या आठवणींच्या हिंदोळ्यावर या उपक्रमाने विद्यार्थ्यांचे भावविश्व उलगडले गेले. त्यातून आसू आणि हसूची अनुभूतीही मिळाली.

प्रत्येकाच्या जीवनात अनेक कडू-गोड घटना घडत असतात. त्यांपैकी काही अत्यंत हृदयस्पर्शी असतात, अंतर्मनाच्या कप्प्यात त्या साठवून ठेवल्या जातात. कारण त्या संस्मरणीय असतात. जीवनात अनुभवास येणाऱ्या अशा घटनांना उजाळा द्यावा, आठवणींच्या हिंदोळ्यावर युवाई स्वार होतानाच भविष्यकाळातील वेध त्यांना घेता यावा, या व्यासपीठाद्वारे त्यांना लिहीता, बोलता करावं या उद्देशाने लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात ‘आठवणींच्या हिंदोळ्यावर’ हा युवाईच्या भावनांचा वाट मोकळी करून देणारा उपक्रम नुकताच आयोजिण्यात आला होता. या नव्या व्यासपीठाचे युवाईने अक्षरशः सोने केले. काही आनंददायक, स्फूर्तीदायी, तर काही हृदयस्पर्शी, भावोत्कट आठवणी सादर करताना सारे सभागृह आसू आणि हसू यात अक्षरशः न्हाऊन निघाले.

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या कल्पनेतून साकारलेल्या आठवणींच्या हिंदोळ्यावर या उपक्रमाद्वारे महाविद्यालयीन विद्यार्थी किती सकस, सकारात्मक विचार करू शकतो याचा प्रत्यय आला. बालपणीच तिलारी धरणाखाली जाणारे गाव, पिढ्यान् पिढ्या सांभाळलेले घर व शेती यांच्याशी असलेले युगानुयुगाचे नाते तोडताना आई-वडिलांची झालेली तगमग व आपल्या बालमनावर झालेला आघात याचे भावोत्कट दर्शन धरणग्रस्त कुटुंबातील अनिल गावडे यांनी घडवले. एक दिवस भर दुपारी स्टोव्हचा भडका उडाल्याने त्या आगीच्या वणव्यात जळणारी जन्मदाती आई, तिचा जगण्यासाठी व मदतीसाठी चाललेला आक्रोश आणि ७० टक्के भाजलेल्या अवस्थेत इस्पितळात दाखल केल्यानंतर झालेला तिचा मृत्यूही काळजाला पोळ पाडणारी दुर्दैवी घटना वयाच्या सहाव्या वर्षी कोवळ्या वयात अनुभवणारा प्रशांत गवस मातेच्या वियोगाचे दुःख कथन करताना स्तब्ध झाला. मातृ सुखापासून हरवलेल्या बालपणाची स्मृती एकीकडे चाळताना, दुसरीकडे महाविद्यालयातील प्रियांका पवार या विवाहित विद्यार्थिनीने पती व आपल्या लहानग्यासह मोटारसायकलवरून प्रवास करीत असताना इन्सुलीजवळ झालेला अपघात, स्वतः गरोदर अवस्थेत असताना झालेली गंभीर इजा, अशाही अवस्थेत कोणीही मदतीला न धावणारा माणुसकीचा आटलेला झरा याची दर्दभरी कथा सांगतच, पतीच्या मित्राने देवदूताप्रमाणे केलेली मदत, हॉस्पिटलात दाखल केल्यानंतर कोमात जाणे आणि गर्भातच झालेला बाळाचा मृत्यू यांची दर्दभरी कहाणी कथन केली आणि साहजिकच पती व एकुलत्या एक बाळासाठी जगताना पुर्नजन्मच झाल्याचे प्रियांकाने सांगितले.

भूषण सावंत या विद्यार्थ्याने शिक्षण घेत असतानाच आपला हमाल ते व्यवस्थापकापर्यंतचा प्रवास कसा झाला, याची स्फूर्तीदायक कथा सांगितली. जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी व प्रामाणिकपणा या गुणांची आवश्यकता आहे, असा संदेश दिला. विद्यार्थी आपल्या आठवणी व्यक्त करताना अतिशय भावूक झालेले होते. या उपक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन व कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल रामकिसन मोरे यांनी केले, तर आभार वंदना पटकारे या विद्यार्थिनीने

सकाळ - 7/7/14
कार्यक्रम - 30/6/14